एका अवलियाला भेटताना...

शेखर देशमुख

क्षणाक्षणाला आपल्या थोर संस्कृतीच्या आणि गौरवशाली इतिहासाच्या मोठमोठ्या गप्पा मारणारे आपण, भूतकाळात घडलेल्या घटना-प्रसंगांच्या नोंदी ठेवण्याबाबतीत नेहमीच उदासीन राहात आलोय. जिथे नोंदीच व्यवस्थित होत नाहीत, तिथे एखाद्या गोष्टीचा संग्रह आणि जतन करण्याचा गुण तरी कुठून आढळणार? अशावेळी चित्रपट संगीतातल्या दिग्गजांच्या प्रदीर्घ कारकीर्दीचे बारिकसारीक तपशील पुस्तकरुपात मांडण्यासाठी गेली पंधराहून अधिक वर्ष मान मोडून काम करणारा विश्वास नेरूरकरांसारखा अवलिया अचानक समोर येतो तेव्हा आश्चर्याचा गोड धक्का बसल्यावाचून राहात नाही. बरं, या माणसाकडे नुसतंच माहितीचं जंजाळ आहे आणि 'हे गाणं कुणी कोणत्या साली, कुणाबरोबर गायलंय? असा डोकंरवाड प्रश्न केल्यावर समोरच्याला इम्प्रेस करण्यासाठी तो बोलबचनगिरी करत सुटलाय तर असंही होत नाही. या माहितीचं आकर्षक स्वरूपात पुस्तक करण्याचं कसब त्याला साधलंय.

कुणाला पटो वा न पटो, पण 'गंधार', 'स्वराशा', 'नौशाद-ए-फिल्मोग्राफी', 'पंचम', 'ओ.पी.नय्यर द म्युझिक मॅस्ट्रो' आणि अगदी अलीकडचं 'शंकर जयकिशन' अशी एकाहून एक देखणी हार्डबाऊंड प्रकारातली पुस्तक देऊन नेरूरकरांनी नवा ट्रेंड सेट करून या क्षेत्रातला पायोनियर असल्याचंही सिध्द केलंय. सर्वसामान्य संगीतप्रेमींना विश्वास नेरूरकर काय चीज आहे हे कदाचित ठाऊक नसेलही, पण म्युझिक इंडस्ट्रीत त्यांचं नाव आज आदराने घेतलं जातंय. लता मंगेशकरांपासून आजच्या जसपिंदर नरूला आणि सुनिधी चौहानपर्यंत आणि नौशाद पासून आजच्या संजिव-दर्शन पर्यंतच्या बहुतेकांना या ना त्या कारणाने कधी ना कधी विश्वास नेरूरकरांशी काम पडलंय. नेरूरकरही देवासारखे त्यांच्या आणि ते विश्वासच्या मदतीला धावून आलेत. इंडियन परफॉर्मिंग राईट्स सोसायटीसाठी वेळोवेळी द्यावा लागणारा कारकीर्दीचा तपशील असो, किंवा नेरूरकरांना पुस्तकासाठी एखादी दुर्मिळ खात्रीशीर माहिती हवी असो, आज नेरूरकर म्युझिक इंडस्ट्रीसाठी हक्काचं माणूस बनलेत.

त्या आत्ममग्न चंदेरी दुनियेतल्या मनस्वी कलावंतांची कारकीर्द पुस्तकरुपात मांडताना, नेरूरकरांनी अनेक थोरामोठ्यांना जवळून बघितलंय. त्यातल्या कित्येकांशी त्यांचे अत्यंत जिव्हाळ्याचे संबंधही



संगीत रसिक म्हणून कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी आशा भोसलेंचं 'स्वराशा' करायला घेतलं.

लतादिदी तर 'गंधार' बघितल्यानंतर खुश झाल्या. म्हणाल्या, सर्वसामान्य रसिकांइतका मलाही या पुस्तकाचा उपयोग होईल. कारण, मला माहिती नसलेला बराचसा भाग यात आलाय.

निर्माण झालेत. संशोधन करताना सुखद अनुभवांबरोबरच काही कटू प्रसंगांनाही त्यांना सामोरं जावं लागलंय. म्हणूनच कदाचित कलावंताची जनमानसातली 'इमेज' आणि प्रत्यक्षातला माणूस अशी दोन रूपंही त्यांनी न्याहाळलीत. आश्चर्य म्हणजे प्रत्येकवेळी श्रम, वेळ आणि पैशाची प्रचंड मागणी करणारं हे संशोधनाचं काम किचकट असूनही पुस्तकागणिक नेरूरकरांचा आत्मविश्वास द्विगुणित होत चाललाय... अशा या गपिष्ट स्वभावाच्या चित्रपट संगीतात रमणाऱ्या छंदिष्टाशी खास दिवाळी अंकासाठी साधलेला हा मोकळाढाकळा संवाद...

'तुमची सुरुवातीच्या काळातली सायक्लोस्टाईल प्रकारातली फिल्मोग्राफी आणि आताची हार्डबाऊंड प्रकारातली पुस्तकं वरवर चाळली तर, त्यात सनावळींसह माहिती ठासून भरलेली दिसते. आजच्या पिढीला कदाचित ही पुस्तकं बोअरिंग भासू शकतात. खरंच का हे काम रुक्ष आहे?'

''तुमच्या प्रश्नाचा रोख मला कळलाय. माहिती हे माझ्या पुस्तकांचं महत्त्वाचं अंग असलं तरीही सुरुवातीची 'गंधार' आणि 'स्वराशा' ही दोन पुस्तकं वगळता बाकी सगळ्या पुस्तकांत दुर्मिळ छायाचित्रं, मान्यवरांचे विश्लेषणात्मक लेख तुम्हाला आढळतील. किंबहुना प्रत्येक पुस्तक आकर्षक नि मनोरंजक व्हावं यावर मी भर देत आलोय. आता तुम्ही तरुण पिढीचा संदर्भ दिलात, पण तुम्हाला आश्चर्य वाटेल माझ्या बहुतेक सगळ्या पुस्तकांना आजच्या पिढीने खूपच चांगला प्रतिसाद दिलाय. अगदी नावं घेऊन सांगायचं झाल्यास, अमेरिकेतला शशी राव नावाचा युवक आहे. जो प्रवासाला निघताना आवर्जुन 'पंचम' हे पुस्तक सोबत नेतो.


''मागे, बनारसहून एका तरूणाचा फोन आला. तो पितापुत्रावर एस.डी.आणि आर.डी. बर्मन या श्रेष्ठ संगीतकार पी.एच.डी. करत होता. आणि बरीच वर्ष मेहनत घेऊनही त्याला आर.डीची परिपूर्ण माहिती मिळत नव्हती. कुणाच्यातरी सांगण्यावरून त्याने 'पंचम' मागवून घेतलं. त्यानंतर एकेदिवशी त्याचा फोन आला. म्हणाला, बहोत-बहोत शुक्रिया आपका. आपकी किताब मिलने के बाद मेरे दो साल बच गये है. अब मैं सीधा थिसीस पे जा सकता हूं. हाच मुलगा नंतर मुंबईत मला भेटायला आला, त्यावेळी साष्टांग नमस्कार घातला त्याने. सांगायचा मुद्दा हा की, जुन्या पिढीने माझ्या कामाचं कौतुक केलंय, आजच्या पिढीनेही तेवढीच मनापासून दाद दिलीय.''

'नेरुरकर, तुमचा हा जो काही चित्रपट संगीताबद्दल माहिती जमवण्याचा, संयमाची परीक्षा पाहणारा अनोखा छंद आहे, तो नक्कीच एका रात्रीत जडला नसावा. असं तर होत नाही की स्वप्न पडलं आणि तुम्ही या कामाला वाहून घेतलंत. मला विचारायचं याची सुरुवात नेमकी कशी झाली?'

''मला आठवतंय, तरुणपणी ब्लॅक आणि व्हाइट चित्रपट आणि चित्रपटसंगीत हा माझा जिव्हाळ्याचा विषय होता. त्यातही स्पेशली मदनमोहनची गाणी माझा वीक पाईंट होता, नव्हे आजही मदनमोहनचं कुठलंही गाणं ऐकलं की मी झपाटून जातो. या वेडापायी मी त्यावेळी किती चित्रपट न थकता बघितले याची गणतीच नाही. तो जमाना रेडिओचा होता. रेडिओला कान लावून गाणी ऐकत बसणे हा माझा आवडता छंद होता. नुस्तं गाणं ऐकून माझं समाधान व्हायचं नाही. आपल्या आवडत्या संगीतकाराने संगीतबध्द केलेल्या एकूणएक गाण्याची नोंद जवळ असालयाच हवी, या इर्षेपायी रेडिओवर लागणारं प्रत्येक गाणं मुखड्यासहीत डायरीत लिहून काढायचो. मला वाटतं इथेच कुठेतरी माझ्या या छंदाला सुरूवात झाली असावी.''

''अशी बरीच वर्ष गेल्यानंतर एक दिवस मी नोंदी केलेली डायरी चाळली. त्यावेळी माझ्या असं लक्षात आलं की, मदनमोहनने संगीत दिलेल्या ८० टक्के गाण्यांची नोंद मी केलीय. मग त्यानंतर इतर गाण्यांचाही शोध घेतला आणि सायक्लोस्टाइल फॉर्ममधली मनदमोहनची पहिली फिल्मोग्राफी तयार केली. या प्रकाराने मी इतका एक्साइट झालो की, सुधीर फडके, सी.रामचंद्र, एस.डी.बर्मन, वसंत देसाई अशा बहुतेक सर्व ज्येष्ठ संगीतकारांच्या फिल्मोग्राफी तयार करत गेलो.''

'अच्छा, लता मंगेशकरांच्या कारकीर्दीचा वेध घेणारं 'गंधार' हे तुमचं पहिलं पुस्तक. भारतीय चित्रपट संगीतावर आपल्या कार्यकर्तृत्वाची अवीट छाप सोडणाऱ्या या गानसम्राज्ञीवर पहिलं पुस्तक करण्यामागे काही निश्चित कारणं होती की हा निव्वळ योगायोग होता? त्याआधी एका प्रश्नाचं उत्तर मला हवंय, सायक्लोस्टाइल फिल्मोग्राफी करता-करता पुस्तक करावं का वाटलं?'




मला भेटलेला ओपी खूपसा भावुक, बराचसा असहाय्य तरीही राजेशाही थाटात जगणारा होता.

''तुमच्या उपप्रश्नाचं आधी उत्तर देतो. सायक्लोस्टाइल प्रकाराला

खूपच मर्यादा होत्या. मर्यादित स्वरूपामुळं खूप कमी वाचकांपर्यंत ते पोहोचत होतं. आणि दुसरं म्हणजे पुस्तकाचा फॉर्म हा अनंतकाळापर्यंत टिकून राहणारा long lasting असा आहे. आता तुमच्या मूळ प्रश्नाकडे वळतो.

''लतादीदींपासून पुस्तकांची सुरुवात करण्यामागे निश्चितच काही कारणं होती. म्हटलं तर हा एक आनंददायी योगायोगही होता. सुरूवातीला सांगितल्याप्रमाणे, सायक्लोस्टाईल फिल्मोग्राफीसाठी मदनमोहनच्या एकूणएक गाण्याची नोंद करताना, नकळत लतादीदींचा स्वर्गीय स्वरही माझ्या कानावर पडत होता. जसजसं ऐकत गेलो, या स्वराची ताकद कळत गेली. लता मंगेशकर नावाच्या गायिकेनं आपल्याला आनंदाची जागा दाखवून दिल्याची, आपलं जगणं समृध्द केल्याची, प्रखर जाणीव होत गेली. त्यातूनच, या अफाट कतृत्वाच्या गायिकेबद्दलची कृतज्ञता म्हणून काहीतरी करून दाखवण्याची भावना मनात रुजली. योगायोगाने त्याचवेळी हरमिंदर सिंह 'हमराज'चे पुस्तक स्वरूपातले गीतकोष माझ्या बघण्यात आले, आणि मला माझा मार्ग सापडला.

एक तर लतादीदींच्या तुलनेत आशाताईंनी गायिलेल गाण्यांची संख्या जास्त होती. आणि दुसरं म्हणज आशाताईंनी गायलेल्या गाण्यांपैकी २४ टक्के गाणी चित्रपट मध्येच बंद पडल्यामुळे म्हणा, किंवा गाणी रेकॉर्ड झालीत पण चित्रपटच आला नाही या प्रकारामुळे रसिकांपर्यंत पोहोचलीच नाहीत.



'पंचम'च्या प्रकाशन सोहळ्यात पहिल्या प्रथम येणारा आणि सगळ्यात शेवटी जाणारा माणूस गुलजारच होता.

''तत्पूर्वी, लतादीदींनी वेगवेगळ्या भाषांमध्ये गायिलेल्या गाण्यांची माहिती जमवण्याचा सपाटाच लावला. ज्या गाण्यांची माहिती सहज उपलब्ध झाली नाही, ती सर्व एचएमव्हीतल्या मुंबईतल्या ऑफिसात पंधरा दिवस ठिय्या मारून मिळविली, पण आश्चर्याची गोष्ट म्हणजे, एवढं सगळं झालं आणि लतादीदींचीही फिल्मोग्राफी सायक्लोस्टाइल फॉर्ममध्ये छापायची ठरवली. मी सायक्लोस्टाइल करण्याच्या इराद्याने भूषण संसारेंना भेटलो. माझ्याकडचं स्क्रिप्ट पाहून ते वेडे झाले. म्हणाले, तू याची सायक्लोस्टाइल फिल्मोग्राफी छापणार आणि भलताच कुणीतरी यावर पुस्तक काढून मोकळा होणार. त्यापेक्षा आपणच पुस्तक का करु नये?

''संसारेंच्या बोलण्याने माझा आत्मविश्वास वाढला. त्याच आत्मविश्वासाने आम्ही पुस्तकासाठी बँकेकडून त्यावेळी २५ हजाराचं कर्ज घेतलं, आणि एका संगीत रसिकाची काय अपेक्षा असू शकते हे डोक्यात ठेऊन 'गंधार'ची मांडणी केली. मी कल्पनाही केली नाही, इतका प्रचंड प्रतिसाद या पुस्तकाला लाभला. लतादिदी तर 'गंधार' बघितल्यानंतर खुश झाल्या. म्हणाल्या, सर्वसामान्य रसिकांइतका मलाही या पुस्तकाचा उपयोग होईल. कारण, मला माहिती नसलेला बराचसा भाग यात आलाय. एकूणातच, 'गंधार' पुस्तक माझ्यासाठी एक वेगळाच अनुभव ठरलं.''

'चित्रपटसंगीतात, लतामंगेशकरांनंतर ओघाने दुसरं नाव येतं आशा भोसलेंचं. 'स्वराशा' आशाताईंच्या प्रदीर्घ कारकीर्दीचा लेखनजोखा मांडणारं 'स्वराशा' हे तुमचं दुसरं पुस्तक. पहिल्या पुस्तकाच्या तुलनेत अधिक आकर्षक. अधिक सुटसुटीत. हे पुस्तक करताना तुम्ही कोणती खबरदारी घेतली?'

''स्वराशाची मांडणी करताना 'गंधार'च्या वेळी राहून गेलेल्या बारिकसारीक त्रुटींकडे मी आधी लक्ष दिलं. बऱ्याचदा काय होतं की, अशा काही चुका असतात ज्या फक्त संपादकाच्याच लक्षात येतात. वाचकांना त्या फारशा जाणवतही नाहीत. 'स्वराशा'ची मांडणी करताना मी आणि माझा सहकारी मित्र प्रसाद सिनकर याने ठरवून टाकलं की, आशाताईंच्या गाण्यावर प्रेम करणाऱ्या प्रत्येक संगीत रसिकाची गरज आणि आवडीनिवडी याला प्राधान्य द्यायचं. त्यासाठी मग आम्ही, सरसकट माहिती न भरता, पुस्तकाचे चार भाग केले. पहिल्या भागात, आशाताईंनी गायलेल्या सोलो गाण्यांची माहिती, दुसऱ्यात गायकांसोबतची गाणी, तिसऱ्यात गायिकांसोबतची गाणी आणि चौथ्यात, एकापेक्षा अधिक गायक-गायिकांसोबतची गाणी, अशी सुटसुटीत विभागणी केली. जोडीला आशाताईंची दुर्मिळ छायाचित्रं होतीच. मला वाटतं, ज्या पध्दतीने जाणकारांनी या पुस्तकाचं स्वागत केलं, त्यावरून आपल्या उद्दिष्टात आम्ही बऱ्यापैकी सफल झालो.''

'असं म्हणतात, मोठ्या उत्सहात तुम्ही 'स्वराशा' करायला घेतलं, पण तितक्या सहजतेनं तुम्हाला माहिती उपलब्ध झाली

नाही. एकेका गाण्याची माहिती मिळवण्यासाठी म्हणे तुम्ही त्यावेळी चांगलीच पायपीट केलीत?'

''खरंय तुमचं म्हणणं. एक तर लतादीदींच्या तुलनेत आशाताईंनी गायिलेल्या गाण्यांची संख्या जास्त होती. आणि दुसरं म्हणजे आशाताईंनी प्रदीर्घ कारकीर्दीत गायिलेल्या गाण्यांपैकी २४ टक्के गाणी चित्रपट मध्येच बंद पडल्यामुळे म्हणा, किंवा गाणी रेकॉर्ड झालीत पण चित्रपटच आला नाही या प्रकारामुळे रसिकांपर्यंत पोहोचलीच नाहीत.

''मला आठवतंय, संगीतकार जयदेव यांच्या 'शगुन' चित्रपटाच्या गाण्यांच्या रेकॉर्डस् उपलब्ध होत नव्हत्या आणि कॅसेट ही. चित्रपटाची व्हिडीओ कॅसेटही उपलब्ध नव्हती आणि प्रिंटही मिळत नव्हती. चित्रपटाच्या बुकलेटवर मात्र गायक म्हणून आशा भोसले, शैला चिखले आणि अनुराधा पौडवाल अशी तीन नावं होती. त्याचवेळी जयदेव यांनी 'शगुन' साठी सर्व गाण्यात फक्त आशाताईंचा आवाज वापरल्याची माहिती माझ्याकडे होती. गंमत म्हणजे, या चित्रपटाचा दिग्दर्शक मेराज हासुध्दा याबाबत खात्रीलयक माहिती देऊ शकत नव्हता. एकदा सहज एका गाण्याच्या संदर्भात संगीत दिग्दर्शक दिलीप दत्ता यांच्याशी गप्पा मारताना 'शगुन'चा विषय काढला. दत्ता म्हणाले, 'शगुन'ची दोन गाणी मी केली होती तुला काय हवंय ते सांग. त्यावेळी त्यांनी मला अचूक माहिती दिली आणि हा घोळ संपुष्टात आला.

''असंच एकदा 'अकेली मतजईयो' या चित्रपटातील 'रस्ते में दो अंजाने' या गाण्याचे गायक म्हणून रेकॉर्डच्या कव्हरवर रफी व लता यांची नावं होती. ते गाणं ऐकताना लक्षात आलं, अरे हा तर आशाचा आवाज. अशारीतीने माझ्या माहितीत एका गाण्याची भर पडली.

''या पुस्तकासंदर्भात चर्चा करण्यासाठी गुलजारकडे गेलो होतो. पूर्ण होण्यापूर्वीच डब्यात गेलेल्या चित्रपटातली गाणी कशी शोधायची यावर आम्ही बोलत होतो. तेवढ्यात दिग्दर्शक प्रकाश झा तिथे आला. त्याने आमचं बोलणं ऐकलं म्हणाला, मेरी एक फिल्म थी, जिसका नाम था 'सहर होने तक' उसमें आशाजी का एक गाना था, लेकिन वो फिल्म कंप्लिट नहीं हुआी. त्या चित्रपटाचा संगीत-दिग्दर्शक होता मानस मुखर्जी. अशा प्रकारे अनपेक्षितपणे आशाताईंच्या गाण्याची ओळख झाली. मला आठवतंय, संगीतकार ओमी (सोनिक) यांनी आशाताईंनी गायिलेली परंतु चित्रपटात समाविष्ट न झालेली पंचवीस गाणी मला त्यावेळी ऐकवली, आणि अशारितीने स्वराशात अचूक माहिती मी देऊ शकलो.''

'तुम्ही अचूक हा शब्द वापरला म्हणून विचारतो, तुमच्या पुस्तकातली माहिती अचूक असते असा बऱ्याचदा दावा केला जातो. तो कसा?'

''हे बघा, माझ्या पुस्तकातली माहिती अचूक असते हा दावा मी कधीही केलेला नाही. करणारही नाही. कारण मी संशोधक असलो तरी चुका या माझ्याकडूनही होऊ शकतात. त्या झालेल्या आहेत. आणि मी त्या मान्यही केल्यात.''

'उदाहरणार्थ?'

माझ्या पुस्तकातली माहिती अचूक असते हा दावा मी कधीही केलेला नाही. करणारही नाही. कारण मी संशोधक असलो तरी चुका या माझ्याकडूनही होऊ शकतात. त्या झालेल्या आहेत. आणि मी त्या मान्यही केल्यात.



शंकर-जयकिशन' वरच्या फिल्मोग्राफीच्या प्रकाशन सोहळ्यात तीनशे प्रती संपल्या.

''लतादिदींवरचं 'गंधार' केल्यानंतर मला एका वाचकाचं पत्र आलं. त्याने पुस्तकातली तीन ते चार गाणी दिदींनी गायली नसल्याचं निदर्शनास आणून दिलं होतं.''

'ओ.के. पुस्तक करताना एखाद्या गाण्याची माहिती अचूक आहे हे ठरविण्यासाठी तुमची एक संशोधक म्हणून कामाची पध्दत काय असते?'

''इथे मी हे आवर्जून स्पष्ट करू इच्छितो की, माहिती कोष तयार करणाऱ्या माणसाला कुठल्याही एका गोष्टीवर विसंबून चालत नाही. म्हणून मीदेखिल कधीही या संदर्भात एकावर विश्वास टाकत नाही. मग भलेही एका गाण्यासाठी कितीही पैसा खर्च करावा लागू दे, कितीही लोकांचे उंबरठे झिजवायला लागू दे. माझ्यापुरतं बोलायचं झाल्यास, अमुक एखाद्या गाण्याची माहिती योग्य आहे की नाही. हे पडताळून बघण्यासाठी मला चित्रपटांची बुकलेट्स, ऑडिओ-व्हिडीओ कॅसेट, एल .पी., सी.डी. आणि संबंधित माणसं यांची मदत होते. यामुळे झालंय काय की, फिल्मोग्राफी तयार करता-करता माझ्याकडे बुकलेट, ऑडिओ-व्हिडिओ कॅसेटमुळे घरातली कपाटं भरलीत.''

'समजा एखादया गाण्याबद्दल शंका असेल, तर बुकलेट तपासायचं, मग ऑडिओ कॅसेट ऐकायची. एवढं करूनही समाधान नाही झालं तर व्हिडिओ कॅसेट बघायची. कंटाळा नाही येत हे सगळं करताना?'

''कंटाळा आला असता, जर मी याकडे धंदेवाईक दृष्टिकोनातून बघितलं असतं. अहो, चित्रपट संगीत ऐकणं हा मला जन्मापासून जडलेला छंद आहे. या संगीतावर माझं नितांत प्रेम आहे. आणि त्या छंदातूनच संगीत क्षेत्रातल्या मान्यवरांच्या फिल्मोग्राफी पुस्तक स्वरूपात तयार करण्याचं काम माझ्या हातून होतंय. मला कंटाळा येईलच कसा?''

'प्रत्येक पुस्तकागणिक तुमचं काम दर्जेदार होत गेलंय. पुस्तकं अधिक आकर्षक, अधिक नीटनेटकी होत गेलीयेत. तुमचं 'नौशाद-ए-फिल्मोग्राफी' आणि 'द-लिजिंडरी-ओ.पी. नय्यर' ही दोन किंवा त्यानंतरची पुस्तकं चाळली तर हा बदल चटकन नजरेत भरतो. हा बदल ठरवून केला होता की...?'

''नौशादसाहेबांची फिल्मोग्राफी करताना पुस्तक अधिकाधिक वाचनीय कसं होईल यावर मी भर दिला. मग त्यासाठी माहिती, छायाचित्रांसोबत, दिनेश लखनपाल; अंबरिश मिश्र, रेखा देशपांडे आदींचे नौशाद साहेबांच्या संगीतातली सौंदर्यस्थळ दाखवणारे, त्यांच्या संगीताचं विश्लेषण करणारे, त्यांच्या व्यक्तिमत्वाचे पैलू उलगडून दाखवणारे लेखही घेतले. त्याने काय झालं की, नुस्तं माहितीचं जाळं न राहतं 'नौशाद-ए-फिल्मोग्राफी'ला परिपूर्ण पुस्तकाचं स्वरूप प्राप्त झालं. पुढे हाच प्रयोग मी पंचम, ओ.पी. आणि शंकर-जय किशन यांच्यावरच्या फिल्मोग्राफी करताना केला. आश्चर्य म्हणजे वाचक आणि जाणकारांचा याला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.''


'लता-आशाच्या तुलनेत नौशाद किंवा ओ.पी. यांच्या पुस्तकासाठी माहिती जमवताना फारसे प्रयास पडले नसावेत. तुमचा नेमका अनुभव काय होता?'

''खरंय तुमचं म्हणणं. नौशाद काय किंवा ओ.पी. काय यांची कारकीर्द मोठी असली तरीही चित्रपटांची संख्या पर्यायाने गाण्यांची संख्या तुलनेने कमी होती. आणि माझ्याकडे बुकलेट किंवा ऑडियो कॅसेटचा पूर्वीपासूनच संग्रह असल्यामुळे, माहिती मिळवण्यासाठी फार पायपीट करावी लागली नाही.

''खरं तर, नौशाद काय किंवा ओ.पी.काय यांनी संगीतक्षेत्रात एकेकाळी दबदबा निर्माण केलाय. काळ गाजवलाय, पण होतं काय की, आजच्या पिढीला, त्यात मीसुध्दा आलोय या संगीतकारांची ताकदच कळत नाही. मला मात्र या पुस्तकांच्या निमित्ताने, त्यांच्या सहवासाने या संगीतकारांची ताकद पूरेपूर कळली.''

'ओ.पी.नय्यर या संगीतकारापेक्षा त्याच्या वागणुकीचे अनेक किस्से सर्वश्रुत आहेत. 'द लिजेंडरी ओ.पी नय्यर' या पुस्तकाच्या निमित्ताने तुम्हाला बघायला मिळालेला ओपीमधला 'माणूस' नेमका कसा होता?'

नौशाद काय किंवा ओ.पी. काय यांची कारकीर्द मोठी असली तरीही चित्रपटांची संख्या पर्यायाने गाण्यांची संख्या तुलनेने कमी होती. आणि माझ्याकडे बुकलेट किंवा ऑडियो कॅसेटचा पूर्वीपासूनच संग्रह असल्यामुळे, माहिती मिळवण्यासाठी फार पायपीट करावी लागली नाही.



खय्याम काय किंवा गुलजार, हे मला कलाकारापेक्षा माणूस म्हणून श्रेष्ठ वाटतात.

''काय असतं, कलाकार कितीही मोठा असला तरीही शेवटी तो माणूसच असतो. त्यामुळे सामान्य माणसामध्ये असलेले गुण-अवगुण त्यांच्यामध्येही असतात. भेटण्यापूर्वी मीसुध्दा ऐकलं होतं की, ओपी हा भयंकर विक्षिप्त गृहस्थ आहे, पण मी म्हणतो, विक्षिप्तपणा कोण नाही करत? फरक इतकाच असतो की, ओपी जेव्हा विक्षिप्तासारखा वागतो तेव्हा त्याची चर्चा होते. माझ्या बाबतीत बोलायचं झाल्यास, पुस्तकाच्या निमित्ताने जवळजवळ दोन-ते तीन वर्ष सतत ओपीच्या संपर्कात होतो. त्याकाळात जुन्या आठवणींनी व्याकूळ होणारा, गतआयुष्यात केलेल्या चुका मोठ्या मनाने मान्य करणारा, खूपसा भावूक तरीही व्यवहारी, बराचसा असहाय्य, सत्तरीतही जगण्यावर भरभरून प्रेम करणारा, आणि राजेशाही थाटात जगणारा ओ.पी. नय्यर मला बघायला मिळाला.''

'ओ.पी. नंतरचं आर.डी. बर्मनवरचं 'पंचम' हे तुमचं पुस्तक खूपच गाजलं. पण मी तर असं ऐकलं होतं की, हे पुस्तक करण्यासाठी

पुस्तकाच्या निमित्ताने गाणी ऐकत गेलो आणि आर.डी. काय चीज आहे हे कळत गेलं. मला त्यावेळी राहून राहून एका गोष्टीचं आश्चर्य वाटत राहिलं की, आर.डी.नं संगीतबद्ध केलेली गाणी जर दर्जेदार नव्हती तर मग मी पडताळणी करण्यासाठी एकेक करत गाणी ऐकत गेलो तेव्हा चालींसकट गाणी पुन्हा आठवायला कशी लागली?

तुम्ही फारसे उत्सुक नव्हता म्हणून.'

'खरंय ते. कारण सुरुवातीला नमूद केल्याप्रमाणे मदन मोहनच्या संगीताचा मी निस्सिम चाहता होतो. त्याच्यापुढे आर.डी. मला कधीच ग्रेट वाटला नव्हता. मुळात ज्यावेळी रशेस शाहने आर.डी.वर पुस्तक करण्याची मला ऑफर दिली, मी फारसा गंभीर नव्हतो. म्हटलं, आर.डी. काही आपला आवडता संगीतकार नाही. मग त्याच्यावर पुस्तक तरी का करावं? पुढे पुस्तकाच्या निमित्ताने गाणी ऐकत गेलो आणि आर.डी. काय चीज आहे हे कळत गेलं. मला त्यावेळी राहून राहून एका गोष्टीचं आश्चर्य वाटत राहिलं की, आर.डी.नं संगीतबद्ध केलेली गाणी जर दर्जेदार नव्हती तर मग मी पडताळणी करण्यासाठी एकेक करत गाणी ऐकत गेलो तेव्हा चालींसकट गाणी पुन्हा आठवायला कशी लागली? यावरून माझ्या असं लक्षात आलं की आर.डी. जर ग्रेट नव्हता तर मग त्याची गाणी मनात का राहून गेली? त्यानंतर मात्र मी रशेस शाहला हे पुस्तक मी करणार म्हणून होकार दिला. नुसता होकार दिला नाही तर वर्षभरात पुस्तक करण्याचं वचनही देऊन टाकलं. म्हटलं, आर.डी. तसा अगदी अलिकडच्या काळातला संगीतकार आहे, त्याची फिल्मोग्राफी करताना फारसे प्रयास पडायचे नाहीत.

''पण, तुम्हाला सांगतो प्रत्यक्ष कामाला सुरुवात केली आणि मला जाणवलं की, हे काम वाटतं तितकं सोपं नाहीय. कारण आर.डी. असा चतुरस्त्र श्रेणीतला संगीतकार होता जो फक्त विविध भाषातील चित्रपट संगीतापुरता थांबला नव्हता, तर त्याने टीव्ही सिरियल्स, डॉक्युमेंट्रीज, अल्बम अशा वेगवेगळ्या प्रकारात चिक्कार काम करून ठेवलं होतं. ही सगळी माहिती एकत्र गोळा करायची हे माझ्यासाठी एक चॅलेंजच होतं.''

'आरडींचं पुस्तक करण्यासाठी तुम्ही म्हणे दोन-तीनदा थेट कलकत्त्याला जाऊन आला होता.'

''हो. त्याला पर्यायच नव्हता. माझे सहकारी संशोधक विश्वनाथ चॅटर्जी आणि मी असे दोघे पुस्तकाच्या कामानिमित्त कलकत्त्याला गेलो. हा विश्वनाथ चॅटर्जी नावाचा माणूस मला भेटला हे मी माझं भाग्यच समजतो. कारण चित्रपट संगीत क्षेत्रातल्या माहितीचा हा चालताबोलता ज्ञानकोष आहे. एक वेळेस मला सांगता यायचं नाही पण चॅटर्जींना कुठलीही माहिती अगदी तोंडपाठ असते. माझ्या आगामी किशोरकुमारच्या फिल्मोग्राफीसाठी चॅटर्जींचं मला बहुमोल सहकार्य लाभतंय.

''सांगत काय होतो, आर.डीं.ची माहिती जमवताना प्रचंड मेहनत घ्यावी लागली. कुठूनही क्लू मिळाला की मी झपाटल्यासारखा त्याचा पिच्छा पुरवायचो. एक दिवस चॅटर्जींनी मला माहिती पुरवली की, कधी तरी त्यांनी नागपूरला रस्त्यावर गणेशोत्सवात चित्रपटाआधी 'माँ की पुकार' नावाचा माहितीपट बघितला होता. त्यात त्यांना संगीत दिग्दर्शक म्हणून आर.डी.चं नाव दिसलं होतं. क्लू तर मिळाला होता, पण संपूर्ण माहिती मिळवायची कशी असा प्रश्न समोर उभा राहिला. आम्ही फिल्म्स डिव्हिजनशी संपर्क साधला. माहितीपट बघण्याचा हेतू समजावून सांगितला. त्या लोकांनी एका तासानं दोनशे रुपये भाडं घेतलं आणि 'माँ की पुकार' हा माहितीपट मला बघायला मिळाला.

'''पंचम'साठी दोनदा कलकत्त्याला जाणं हा तर आमच्यासाठी एक अनुभवच ठरला. आर.डी.ने बंगालीत केलेल्या गाण्यांचा शोध घेणं हा कलकत्त्याला जाण्याचा मुख्य उद्देश होता. तत्पूर्वी आम्ही तिथल्या एचएमव्ही ऑफिसशी संपर्क साधला. त्यांनी काही महत्त्वाची माहिती आम्हाला पुरवली. त्यानेही समाधान झालं नाही म्हणून मग आम्ही दिसेल त्या ऑडिओ कॅसेटच्या दुकानात जाऊन आर.डी.च्या कॅसेटस विकत घेण्याचा सपाटा लावला. अगदी संपर्कात येईल त्या बंगाली माणसाला आम्ही विचारायचो, पण कुणी काहीही फेकायचे. खात्रीशीर माहिती कुणाकडेही उपलब्ध होत नव्हती. कलकत्त्याला जाण्यापूर्वी आर.डी.ने बंगालीत ३१ चित्रपट केल्याचं कळलं होतं. पण इथे

'स्वराशा' या पुस्तकाचं प्रकाशन करताना मनोहर जोशी आणि देव आनंद.



तर चार-पाच दिवस फिर फिर फिरूनही १६ ते १७ चित्रपटांची माहिती मिळाली होती. अखेर निघताना एका व्हिडिओ पार्लरमध्ये एकदम पाच-सात सिनेमांची माहिती मिळाली.

''तिथल्या मुक्कामात स्थानिक पेपरात चित्रपट संगीताविषयीच्या पुस्तकांची माहिती मिळाली. ताबडतोब ते पुस्तक विकत घेतलं. माझ्याकडची माहिती आणि या पुस्तकातली माहिती हे पडताळून पाहिलं. त्या वेळी माझ्या असं लक्षात आलं की, संशोधकानं चुकून एक-दोन चित्रपटांचं श्रेय बप्पी लाहिरीला देऊन टाकलंय. आर.डी.ने 'कालिदास' नावाचा एक चित्रपट केला, त्याची ऑडिओ कॅसेटही बाजारात आली. पण तो चित्रपट प्रदर्शित न झाल्यामुळे त्याची नोंद कुठेच झाली नाही. आर.डी.च्या '१९४२ ए लव्ह स्टोरी' या सिनेमाने तुफान यश मिळवलं. बंगालीत या नावाचा फक्त अल्बम निघाल्याची गमतीशीर माहिती मला त्या मुक्कामात कळली. आर.डीं.ची माहिती मिळवण्यासाठी काय म्हणून केलं नाही आम्ही. कलकत्त्यातली बहुतेक सर्व दुकानं पालथी घातली. मी बंगाली लिपी पाठ केली. असं करता करता तब्बल अडीच वर्षांनी 'पंचम'चं काम पूर्ण झालं. मला इथे आवर्जून नमूद करावंसं वाटतंय की, ज्या कामासाठी मी सुरुवातीला फारसा उत्सुक नव्हतो, त्याच कामाने मला खरंखुरं समाधान मिळवून दिलं आणि याच कामामुळे मला आजवरची सर्वात लक्षात राहणारी प्रतिक्रिया मिळाली, ती गायक-संगीतकार भूपेंद्रकडून. पंचमचा दणक्यात प्रकाशन सोहळा झाला. गुलजार, आशाताई, भूपेंद्र अशा अनेक मान्यवरांनी सोहळ्याला उपस्थिती लावली. सोहळा झाल्यानंतर दोन दिवसांनी भूपेंद्रचा फोन आला. म्हणाले, 'पंचम' किताब बनाके तुमने ऐसा काम करके दिखाया है कि अगर कल कोई पंचम का नाम मिटाना भी चाहे तो वो मुमकिन नहीं.... माझ्यासारख्या एका सामान्य रसिकाला यापेक्षा अधिक काय हवं?''

'सात सुरों का साथ शंकर-जयकिशन' हे तुमचं अलिकडच्या काळात प्रकाशित झालेलं पुस्तक देखणेपणात तुमच्या सर्व पुस्तकांत उजवं ठरावं. या पुस्तकाबद्दल, पुस्तकाला मिळालेल्या प्रतिसादाबद्दल काय सांगाल?'

''या पुस्तकाबद्दल इतकंच सांगू इच्छितो की, प्रकाशन सोहळा झाला त्या दिवशी, पुस्तकाच्या ३०० प्रती हातोहात खपल्या. या पुस्तकावर दर्दी जाणकार प्राध्यापक सुहासचंद्र कुलकर्णी यांना मी हे पुस्तक दिलं. पुस्तक बघितल्यावर ते मला म्हणाले, 'विश्वास, या पुस्तकाची पानं मी जशी उलटत जातो तसं ते माझ्याशी बोलू लागतं.' मला वाटतं प्रा. कुलकर्णींची ही प्रतिक्रिया पुस्तकाबद्दल बरंच काही सांगून जाते.''



नौशाद-ए-फिल्मोग्राफी करताना तुलनेने कमी प्रयास पडले.

'नेरूरकर, राहून राहून एक गोष्ट तुम्हाला विचारावीशी वाटते. तुम्ही आता गेली कित्येक वर्षं संशोधनाच्या निमित्ताने आजवर चांगली वाईट हजारो गाणी ऐकली असतील. तुमच्या म्हणून काही आवडीनिवडी, चांगल्या-वाईटाचे निकष तयार झाले असतील... पण हे सगळं करताना, विरंगुळा म्हणून संगीत ऐकण्याचा आनंद आपण गमावून बसलोय असं नाही का वाटत?'

''अजिबात नाही. कारण दोन पुस्तकांदरम्यान बराचसा मोकळा वेळ मला मिळत असतो. त्यात आवडती गाणी ऐकण्याचा आनंद मला मिळतोच आणि दुसरं असं की, ज्यांच्या गाण्यांवर मी प्रेम करत आलोय अशांवरच शक्यतो आजवर मी पुस्तकं केलीत. किंबहुना आपल्या आवडत्या कलावंतावर पुस्तक करणं हेच माझं धोरण राहिलंय. त्यामुळे संशोधनाचं काम करताना संगीत ऐकण्याचा निर्भेळ आनंद मला लुटता येतो.''

'कलावंतांच्या कलंदर वृत्तीचे अनेक खरे-खोटे किस्से पसरत असतात. पुस्तकाच्या निमित्ताने तर तुम्ही आजवर अनेक कलावंतांना भेटलात. त्या वेळी तुम्हाला त्यांच्या वागणुकीचा कसा अनुभव आला?'

''मुळात असंय की जरी मी कलंदर वृत्तीच्या कलावंतांना भेटत असलो, तरीही या कलाकारांकडून पुस्तकासाठी माहिती मिळवण्यापलीकडे कोणतीही अपेक्षा करायची नाही, हे तत्त्व माझ्यापुरतं सुरुवातीपासूनच पाळत आल्यामुळे एखाद् दुसरा अपवाद वगळता चित्रपटसृष्टीकडून मला छानच वागणूक मिळाली.

''होतं काय, या कलावंतांच्या नावाचा फायदा घेऊन अनेक जण त्यांना नाडत असतात. त्यामुळे अनोळखी माणसावर चटकन विश्वास टाकायची त्यांची तयारी नसते. दुसरं असं की, कायम

असुरक्षिततेच्या भावनेत असलेला, सृजनशीलतेसाठी स्वत:ला शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या झोकून देणारा कलावंत वृत्तीने कलंदर असणार हे कुठे ना कुठे तरी मान्य करावंच लागतं. तुम्ही बघा, समजा दिवसाचे पंधरा-सोळा तास तुम्ही शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या खूप मेहनत घेतलीय आणि थकल्याभागल्या अवस्थेत कुणीतरी येऊन तुमच्याकडे काहीतरी मागणी करतोय. साहजिकच आपली चिडचिड होणार. नेमकं असंच काहीसं या कलावंतांच्या बाबतीतही घडतं.

''उलट कलावंताला आपला त्रास होऊ नये याचीच आपण खबरदारी घ्यायला हवी. त्यासाठी संयम हवा, तुमच्या कामात सातत्य हवं. त्यानेच कलावंतांचा तुमच्यावर विश्वास बसतो आणि बऱ्याचदा एक छानसं नातंही तयार होतं. गुलजार, खय्याम यासारखे बुजुर्ग, समीरसारखा या काळातला गीतकार यांच्याबरोबर माझं खास नातं तयार झालंय. तुम्हा लोकांना गुलजार, खय्यामसारखी माणसं खूप विक्षिप्त वाटतात. मला मात्र हे कलावंत त्यांच्या कलेपेक्षा माणूस म्हणून श्रेष्ठ वाटतात. गुलजारसारखा एवढा मोठा माणूस प्रकाशन सोहळ्याचं आमंत्रण द्यायला गेल्यावर माझ्या पाठीवर कौतुकाची थाप मारतो आणि सांगतो : 'डोन्ट वरी विश्वास, आय विल बी द फर्स्ट पर्सन टू कम ॲण्ड विल बी द लास्ट पर्सन टू गो.' तुम्हाला आश्चर्य वाटेल 'पंचम'चा प्रकाशन सोहळा संपला. बरेच मान्यवर निघून गेले. सगळं शांत झाल्यावर गुलजार माझ्याजवळ आले. म्हणाले, तुझी हरकत नसेल तर मी जाऊ शकतो का? मला सांगा, गुलजार नावाचा कलावंत विक्षिप्त आहे यावर मी कसा विश्वास ठेवायचा?

''जो अनुभव गुलजारसाहेबांचा तोच समीरचादेखील. काही ना काही कामानिमित्त माझं सतत समीरच्या घरी जाणं-येणं असतं. पण दर वेळी हा गीतकार माझी आपुलकीने चौकशी करतो. समजा कामात खूप गर्क असलाच तर परवानगी घेऊन जातो आणि जातानाही चाय पीने के बगैर जाना नही असा प्रेमळ दमही भरतो.''

'एकेका पुस्तकावर तुम्ही प्रचंड मेहनत घेता. खूपसा वेळ, पैसा आणि श्रम खर्च करता. न थकता न कंटाळता एकापाठोपाठ एक महत्त्वाचे दस्तावेज तुम्ही तयार करत जाता. या सगळ्यातून तुम्हाला काय मिळतं?'

''खूप महत्त्वाचा प्रश्न विचारलात. हे सगळं केल्यानंतर मला काय मिळतं? पैसा तर नक्कीच मिळत नाही. मग मिळतं काय तर एक प्रकारचं आत्मिक समाधान. आपल्या आवडत्या कलाकाराने आपल्या कलेद्वारे केलेल्या उपकाराची पुस्तकरूपात परतफेड केल्याचं समाधान. दुसरं म्हणजे पुस्तकाच्या निमित्ताने अनेक जुन्या नव्या कलावंतांशी ओळखी होतात. त्यांना जाणून घेता येतं. त्यातूनच पुढे वेगळं नातं निर्माण होतं. एरवी, माझ्यासारख्या बँकेत काम करणाऱ्या माणसाला हे सर्व कसं मिळालं असतं?''

'आज जगण्याचा वेग प्रचंड वाढलाय, आयुष्यातली गुंतागुंत वाढलीय. त्याचबरोबर सातत्य आणि संयम हा गुणही लोप पावत चाललाय, अशा वेळी फिल्मोग्राफीसारख्या पुस्तक प्रकाराला कितपत भविष्य आहे असं वाटत?'

''हे मला मान्य आहे की आमचं जीवन इतकं वेगवान झालंय की छोट्यामोठ्या गोष्टींसाठी लोकांकडे वेळ नाहीय. पण मला वाटतं की एकच उणीव फिल्मोग्राफी प्रकारचं भविष्य निश्चित करणारी आहे. अगदी स्पष्ट सांगायचं तर चित्रपट संगीत हा प्रकार आजच्या पिढीत अधिकाधिक लोकप्रिय होत चाललाय. आणि ही पिढी खूप चिकित्सक आहे. परिपूर्ण माहितीसाठी जागरूक आहे. अशा वेळी जर एखाद्या तरुणाला आपल्या आवडत्या संगीतकार किंवा गायकाविषयी माहिती हवी असेल, तर फिल्मोग्राफीच त्याचं पुरेपुर समाधान करू शकते. आता तर चित्रपट संगीत हासुद्धा एक पीएचडीचा विषय बनल्यामुळे विद्यार्थ्यांना या फिल्मोग्राफी मार्गदर्शक ठरू शकतील. राहता राहिला प्रश्न माझं हे काम पुढच्या पिढीने चालू ठेवण्याचा. तर याबाबतीत मी काहीसा निश्चिंत आहे. कारण जसं मी फिरोज रंगूनवाला, भास्करराव धारप यांच्या कामामुळे प्रभावित होऊन या क्षेत्राकडे वळलो, तसं माझ्यापासून प्रेरणा घेऊन पुढच्या पिढीतसुद्धा कुणीतरी विश्वास नेरूरकर नक्कीच तयार होणार...''

... तर असा हा तुमच्या आमच्यातला, संगीतप्रेमी या ओळखीवर समाधान न मानता एका ध्यासाने पछाडलेला खराखुरा रसिक. सध्या नव्या जोमानं किशोरकुमारची फिल्मोग्राफी तयार करण्यात गुंतलाय. या निमित्ताने पुन्हा एकदा विश्वास नेरूरकर नावाचा हा अवलिया कलकत्त्याची वारी करून आलाय. येताना नेहमीप्रमाणे त्याने काही आठवणी, काही किस्से सोबत आणलेत. जे अर्थातच आपल्याला आगामी किशोरकुमारच्या पुस्तकात वाचायला मिळतील. त्यांच्या या पुस्तकाला आणि भविष्यातल्या योजनांना 'चंदेरी'तर्फे हार्दिक शुभेच्छा!

या कामामुळे श्रेष्ठ कलावंतांच्या सान्निध्यात येण्याचं भाग्य मला लाभलं.

